# घरपोच धान्य योजनेबद्दल शंका - समाधान

| प्रश्न क्र. १. | घरपोच धान्य योजना राबविण्यासाठी सर्वप्रथम आम्ही कशी सुरुवात केली पाहिजे? |
|---|---|
| उत्तर | या योजनेत सहभागी व्हायचे असेल तर सर्वप्रथम या योजनेचे माहितीपत्रक सर्व नागरिकांना वाटले पाहिजे. तसेच ते गावातील लोकप्रतिनिधींना दिले पाहिजे. त्याचे वाचन केल्यावर गावातील किमान ६० टक्के रेशनकार्ड धारकांनी योजनेमध्ये सहभागी होण्याची तयारी दाखविल्यास तसे पत्र ताबडतोब आपल्या तालुक्याचे तहसिलदार यांना द्यावे. या पत्रात ‘आमच्या गावातील लोक घरपोच धान्य योजनेत सहभागी होऊ इच्छितात तरी आमच्या गावातील लोकांचे पैसे भरुन घेऊन आम्हाला या योजनेत सहभागी करुन घ्यावे’ अशी विनंती करणारे पत्र तहसिलदार यांना द्यावे.<br><br>त्यानंतर एका ठराविक दिवशी चावडीवर किंवा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये तलाठी / पुरवठा निरीक्षक व दुकानदार यांचे उपस्थितीत सर्व लोकांची रक्कम एकत्र जमा करावी. विहित नमुन्यामध्ये सह्या घेऊन अशा यादीच्या दोन प्रती कराव्यात. त्यानंतर एकत्र झालेल्या अशा रकमेतून दुकानदाराचे कमीशन वजा करुन उर्वरित रकमेचे धान्याच्या योजनानिहाय चलन तलाठी किंवा पुरवठा निरिक्षक तयार करुन त्यावर दुकानदाराची स्वाक्षरी घ्यावी. अशी रक्कम शक्यतो त्याच दिवशी शासकीय तिजोरीत भरावी. रक्कम भरल्यानंतर २-३ दिवसांत गावक-यांच्या सोयीने धान्यवाटपाचा दिनांक, दिवस, वेळ व ठिकाण ठरवावे व प्रत्यक्ष गावामध्ये जावून धान्याचे वाटप करावे. |
| **प्रश्न क्र. २.** | **तीन / सहा महिन्याचे धान्य एकदाच वाटप करताना जर ६०-७०% लोक त्यात सहभागी झाले व उर्वरित ३०% लोक सहभागी झाले नाहीत तर त्यांचा हिशोब कार्यालयात कशा पद्धतीने ठेवावा?** |
| **उत्तर** | तहसील कार्यालयात ही योजना सुरु करताना, एका नोंदवहीमध्ये गावाच्या नावापुढे घरपोच धान्य योजनेमार्फत व नियमित व्यवस्थेमार्फत अशा दोन रकान्यात माहिती भरल्यास रेशन दुकानदाराला दोनदा धान्य दिले देणार नाही. पाच तारखेनंतर रेशन दुकानदार चलन भरण्यास आल्यावर हे रजिस्टर समोर ठेवावे व घरपोच धान्य योजनेमार्फत देण्यात आलेला मासिक कोटा कमी करुन उर्वरित धान्य त्यास द्यावे, जेणेकरुन ग्राहकांचेदेखील नुकसान होणार नाही. |

## घरपोच धान्य योजनेबद्दल शंका - समाधान

| प्रश्न क्र. ३. | **घरपोच धान्य योजनेमुळे सर्वसामान्यांसाठी कोणते फायदे निदर्शनास आहे आहेत?** |
|---|---|
| **उत्तर** | ▪ या योजनेमुळे गरजवंताला चांगले धान्य वेळेवर मिळण्याची हमी प्राप्त झाली आहे.<br>▪ धान्याची सुरक्षिततता निर्माण झाल्यामुळे व अगोदरच घरात धान्य आल्यामुळे मुले-बाळे अर्धपोटी व उपाशी राहणार नाहीत याची खात्री सर्वसामान्य ग्राहकांमध्ये निर्माण झाली.<br>▪ उद्याची जगण्याची भ्रांत कमी झाल्याने त्यांना रोजगारावर लक्ष केंद्रीत करणे सोपे होऊन त्यांच्या क्रयशक्तीत वाढ झाली आहे.<br>▪ कुपोषणावर मात करणारी ही योजना गरीबांना वरदान ठरली आहे.<br>▪ रेशन दुकानदाराकडे मारावे लागणारे हेलपाटे कमी झाल्याने सर्वसामान्य लोकांचे समाधान होऊन त्यांच्या वेळ, श्रम व खर्चात बचत झाली. |
| **प्रश्न क्र. ४.** | **आमच्या गावचे अनेक लोक द्राक्ष बागांच्या कामासाठी ऑक्टोबर महिन्यापासून चार महिने दुस-या तालुक्यात मजूरीसाठी जातात. आमच्यासाठी घरपोच धान्य योजना उपयुक्त आहे का?** |
| **उत्तर** | आत्ताच्या व्यवस्थेमध्ये मुळ गावामध्ये जिथे रेशन कार्ड आहे, अशाच ठिकाणी धान्य मिळते. स्थलांतरीत मजूरांसाठी जी कार्यपद्धती ठेवण्यात आलेली आहे ती अतिशय किचकट आहे. त्यामध्ये आपल्या मुळच्या तालुक्यात कार्ड रद्द करणे किंवा काही नावे कमी करणे व तसा दाखला दुस-या तालुक्यात घेऊन जाणे इ. प्रक्रिया अपेक्षित आहे.<br><br>त्यापेक्षा घरपोच धान्य योजनेमध्ये एकदाच तीन महिने, सहा महिने किंवा वर्षाचेसुद्धा धान्य घेण्याची सोय असल्यामुळे एकदा धान्य घेतल्यानंतर एखादे कुटुंब स्थलांतरीत झाले तरी त्याच्या भुकेचा प्रश्न निर्माण होत नाही. |
| **प्रश्न क्र. ५.** | **घरपोच धान्य योजनेमध्ये शासनाचे व लोकांचे काम कमी झाले आहे काय ? व असल्यास कसे?** |
| **उत्तर** | घरपोच धान्य योजनेमध्ये खालील प्रकारे धान्य वितरणाची कार्यपध्दती अतिशय सोपी व सुलभ झाली आहे :<br>▪ ५० किलोच्या पोत्याच्या प्रमाणात धान्य वाटप होत असल्यामुळे प्रत्यक्ष एखाद्या गावातील धान्याच्या वाटपास केवळ एक ते दीड तास लागतो. |

# घरपोच धान्य योजनेबद्दल शंका - समाधान

| | |
|---|---|
| | ▪ सर्वसाधारणपणे एका तालुक्यात १२५-१५० पर्यंत गावे असतात. टप्याटप्याने एक-एक गाव या योजनेत सहभागी होत असल्यामुळे व केवळ ३/६ महिन्यात एकदाच एका गावात धान्य वाटावे लागत असल्यामुळे प्रत्येक गावाच्या धान्य वाटपाच्या वेळी पुरवठा निरीक्षक / मंडळ अधिकारी / तहसीलदार यांना हजर राहता येणे शक्य आहे. अशा पध्दतीने पुरवठा अधिका-यांची मर्यादित संख्या असूनही योग्य नियोजन केल्यास वितरणावर १००% नियंत्रण राहू शकते.<br>▪ या योजनेमुळे दुकानदारांकडे मारावे लागणारे हेलपाटे व लोकांचा त्रास तसेच भांडणे संपुष्टात आली आहेत.<br>▪ रेशन दुकानदारालासुद्धा त्याचे नियमानुसार देय असलेले कमिशन मिळत असल्यामुळे तक्रारीला जागा उरलेली नाही.<br>▪ संपूर्ण गावक-यांसमोर प्रत्यक्ष धान्यवाटप होत असल्यामुळे गरीब कोण? श्रीमंत कोण? हे समजून येते. तसेच कोणाला किती धान्य मिळते हे समजते. प्रत्यक्ष राहणा-या व्यक्तीला धान्य मिळते व धान्याचा काळा बाजार करण्याची संधी मिळत नाही. |
| **प्रश्न क्र. ६.** | **एकदाच ३/६ महिन्याचे धान्य लोकांना मिळाल्यामुळे त्याची विक्री ते बाजारात करणार नाहीत का?** |
| **उत्तर** | वास्तविक स्वातंत्र्यानंतर गरीबांच्या नावावरील धान्य हे त्यांना १००% पोचविण्यामध्ये आपल्याला यश आलेले नाही. सुमारे ३०-७०% पर्यंत धान्याची गळती वेगवेगळया राज्यात नोंदविली गेली आहे. अशा परिस्थितीत ग्राहकाच्या नावावरील १००% धान्य त्याला दिल्यानंतर अन्य लोकांनी त्याची काळजी करण्याचे कारण नाही. |
| **प्रश्न क्र. ७.** | **एकदम धान्य वाटप केल्यावर या धान्याची साठवणूक ग्राहक करु शकतील काय?** |
| **उत्तर** | या देशात पारंपारिकरित्या शेतकरी हे आपले वर्षाचे धान्य कणगीमध्ये किंवा जमिनीखालीदेखील पेव करुन साठवत आले आहेत. स्वतःच्या पोटच्या मुलाप्रमाणेच या धान्याची काळजी घरातील महिला घेत असत. असे धान्य दर २-३ महिन्यांनी उन्हात वाळवण्यापासून सर्व प्रकारची काळजी महिलांकडून घेतली जाते.<br><br>शासकीय गोदामामध्ये अशा प्रकारची काळजी घेतली जाऊ शकत नाही. त्यामुळे लाखो टन धान्य शासकीय गोदामात, रेल्वे वॅगनमध्ये किंवा धान्य खरेदी केंद्रावर उघडयावर पडण्यापेक्षा प्रत्येक घरामध्ये विकेंद्रीत स्वरुपात ६-६ महिने किंवा १ वर्षाचे धान्य आगाऊ स्वरुपात आपण देऊ शकलो तर जगात कोणत्याही देशात नसलेली अन्न सुरक्षा गरीबाच्या घरात निर्माण होऊ शकेल. |

# घरपोच धान्य योजनेबद्दल शंका - समाधान

| | |
|---|---|
| **प्रश्न क्र. ८.** | **दुर्गम भागातील लोकांना घरपोच धान्य योजनेमुळे कोणता फायदा होईल?** |
| **उत्तर** | अतिशय दुर्गम अशी अनेक गावे पश्चिम घाटामध्ये आहेत. अनेक गावांना जायला पक्का रस्ता नाही. तसेच काही गावातील लोकांना दररोज १५-२० किलोमीटर एवढी पायपीट करावी लागते. पावसाळयात तर अतिशय त्रास होतो. अशा अतिशय दुर्गम गावांमध्ये तर ही योजना म्हणजे एक वरदान आहे. एरवी देखील अशा दुर्गम गावामध्ये धान्य नेले जात नाही.<br><br>नंदूरबारमधील सरदार सरोवर परिसरातील अनेक गावांमध्ये ही योजना अतिशय यशस्वी झाली आहे. तेथे वर्षानुवर्षे दर महिन्याला धान्य नेण्यामध्ये अडचणी होत होत्या, अशा गावांमध्ये एकदाच किंवा दोनदा पावसाळा सुरु होण्यापूर्वी जर घरे धान्याने भरून टाकली तर त्या लोकांना ख-या अर्थाने या योजनेचा लाभ होऊ शकतो हे निदर्शनास आले आहे.<br><br>नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी तालुक्यातदेखील आंबेवाडी सारख्या दुर्गम भागामध्ये लोकांनी तब्बल ६ महिन्यांचे धान्य घेतले आहे. एवढेच नाही तर कित्येक पाडयात पावसाळयापूर्वी व रस्ते आणि जनसंपर्क बंद होण्यापूर्वी पुढील ६ महिन्यांचे धान्य अगोदर घेतल्याची उदाहरणे आहेत. |
| **प्रश्न क्र. ९.** | **एखाद्या कुटुंबामध्ये व्यसनी पुरुष असेल तर हे धान्य विकले जाणार नाही का?** |
| **उत्तर** | नाशिक जिल्ह्यातील सुमारे २०० च्या वर आदिवासी गावांमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या गावामध्ये अभ्यास केला असता असे निदर्शनास आले आहे की, व्यसनी पुरुषाकडून कुटुंबातील महिलेला मारझोड करुन व तिने डब्यामध्ये किंवा अन्यत्र बाजूला ठेवलेले पैसे हिसकावून घेतले जात असत. पण त्याऐवजी आता धान्य विकत घेतल्यामुळे आपोआपच या सर्व धान्यावर घरातील महिलेचे नियंत्रण आले आहे. त्यामुळे कुटुंबियांचे धान्यावर लक्ष असणारी ही योजना अशा कुटुंबांना जास्त उपयुक्त आहे. |
| **प्रश्न क्र. १०.** | **एखाद्या गावात ३/६ महिन्यांचे धान्य एकदम वाटल्यावर ते धान्य दुकानदार / अन्य कोणी गोळा करुन पुन्हा बाजारात विकायला आणू शकतील का?** |
| **उत्तर** | एकदा वाटप केलेले धान्य घराघरात जाऊन गोळा करुन पुन्हा तालुका / जिल्हा पातळीवर आणणे सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि नैतिक कारणांमुळे कोणालाही शक्य नाही. शिवाय असे धान्य प्रत्यक्ष घरातून गोळा करुन तालुका / जिल्ह्याला आणण्याचा खर्च प्रचंड आहे व ते आर्थिक दृष्टीने कोणालाही परवडणारे नाही. त्यामुळेच घरपोच धान्य योजनेला यश प्राप्त झाले आहे. |

# घरपोच धान्य योजनेबद्दल शंका - समाधान

| | |
|---|---|
| **प्रश्न क्र. ११.** | **घरपोच धान्य योजनेमुळे योजनेमुळे शासनाचा किती खर्च वाढणार आहे?** |
| **उत्तर** | या योजनेमुळे शासनाचा कोणताही अतिरिक्त खर्च होत नाही. किंबहुना १५-२०% धान्याची बचत होणे अपेक्षित आहे. ही बचत मुख्यतः यादीत नावे असतानाही प्रत्यक्ष गावात न राहणारे लोक, धान्य न घेणारे काही लोक इ. मुळे आहे शिवाय प्रत्येक गावात दर महिन्याला यापूर्वी धान्याची वाहतूक करावी लागत होती. प्रत्येक जिल्ह्यामध्ये सर्वसाधारणतः ८००-१२०० गावे आहेत व या सर्व गावांमध्ये १२ वेळा धान्याची वाहतूक पूर्वी होत होती. त्याऐवजी दर ३ महिन्याला जर धान्य दिले गेले तर सर्व गावांच्यामध्ये महिन्याला साधारणतः दोन ते अडीच कोटी रुपये एका जिल्ह्यामध्ये वाहतूक खर्चात बचत होऊ शकेल. धान्याची बचतदेखील एका जिल्ह्यामध्ये सुमारे दोन कोटी रुपये होईल. |
| **प्रश्न क्र.१२.** | **घरपोच धान्य योजनेनुसार एकदम ३/६ महिन्यांचे पैसे भरावे लागतात असे एकदम पैसे भरण्यास अडचण असल्यास लोकांनी काय करावे?** |
| **उत्तर** | या योजनेत सहभागी झालेच पाहिजे असा कोणताही आग्रह नाही. वर्षानुवर्षे सार्वजनीक वितरण व्यवस्थेमधून निदर्शनास आलेले दोष दूर करण्यासाठी एक पर्यायी योजना म्हणून सदर योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेमध्ये ज्या व्यक्ती सहभागी होणार नाहीत त्यांना आपले धान्य नेहमीच्या पध्दतीने दरमहा स्वस्त धान्य दुकानदारामार्फत घेता येईल. |
| **प्रश्न क्र.१३.** | **घरपोच धान्य योजनेत सुरुवातीला १०-२०% लोक सहभागी झाल्यास योजना राबविता येणार नाही काय?** |
| **उत्तर** | अशा पध्दतीने २०-३०% लोकांनासुध्दा सहभागी करुन घेता येऊ शकेल. तथापी त्यामुळे प्रशासकीय काम कमी होत नाही. शिवाय बहुसंख्य लोक योजनेच्या बाहेर राहत असतील तर इच्छित परिणाम साधला जात नाही. त्यामुळे किमान ६०% पेक्षा जास्त लोक सहभागी झाले तरच शासकीय यंत्रणेला देखील एक-एका गावात येवून धान्य वाटप करता येणे शक्य होऊ शकेल व ते वेळ व वाहतूक खर्चाची बचत करणारे ठरु शकेल. |
| **प्रश्न क्र.१४.** | **पुर्वी स्वस्त धान्याचे पोते हे दुकानदाराला मिळत होते. धान्य वाटून झाल्यावर आता हे पोतेदेखील रेशन कार्ड धारकाला मिळणार का?** |
| **उत्तर** | होय. धान्याबरोबरच धान्याचे पोतेदेखील घरपोच धान्य योजनेमध्ये ग्राहकाच्या मालकीचे होते व आदिवासी भागात याचे रेशन कार्ड धारकांनी विशेषत्वाने स्वागत केले आहे. |

## घरपोच धान्य योजनेबद्दल शंका - समाधान

| | |
|---|---|
| **प्रश्न क्र.१५.** | **घरपोच धान्य योजना आमच्या गावात राबवायची आहे. आम्ही सर्व लोक तहसीलदार यांना भेटलो असता, त्यांनी जास्त धान्याची यासाठी आवश्यकता आहे असे सांगितले. या योजनेसाठी जास्त धान्य लागते हे खरे आहे काय?** |
| **उत्तर** | हे म्हणणे अजिबात बरोबर नाही. घरपोच धान्य योजनेची अंमलबजावणी करताना फार मोठ्या प्रमाणावर जास्त धान्य लागते हे म्हणणे योग्य नाही. कारण सर्वसामान्यपणे प्रत्येक धान्याच्या गोदामामध्ये महिन्याच्या शेवटी किमान ४००-५०० क्विंटल धान्य असते. घरपोच धान्य योजना राबविण्यापूर्वी लोकांची मानसीकता घडविणे, त्यांनी एकत्र येऊन आगाऊ रक्कम भरणे अपेक्षित आहे व त्यासाठी काही काळ जावा लागतो. त्यामुळे एकाच वेळी सर्व गावातील लोक पैसे भरत नाहीत.<br><br>पहिल्या महिन्यात जर चार गावांनी तीन महिन्यांसाठी पैसे भरले तर केवळ चार गावांपुरत्या लोकांना तीन महिन्याच्या एवढे धान्य लागते. मात्र त्यामहिन्यापासून पुढे दोन महिने या गावांमध्ये धान्य वाटावे लागत नाही. त्या काळात आणखी नव्याने ३/४ गावे प्रतीमहिना पूर्ण होऊ शकतात. अशा पद्धतीने टप्प्या-टप्प्याने गावे सहभागी होत असल्यामुळे त्यासाठी अतिरिक्त धान्याची अजिबात आवश्यकता नाही. |
| **प्रश्न क्र.१६.** | **घरपोच धान्य योजनेमुळे शासनाची प्रतिमा सुधारण्यास कशा पद्धतीने मदत झाली आहे?** |
| **उत्तर** | ▪ तालुका गोदामापासून धान्य थेट ठरलेल्या सार्वजनिक ठिकाणी सर्वांसमोर वाटप केले जात असल्याने कार्यपद्धतीमधील पारदर्शकता अधिक प्रकर्षाने जाणवू लागली.<br>▪ कोणत्याही यंत्रणेमार्फत धान्य प्रत्यक्षात मिळाले / नाही याची तपासणी करता येणे असल्याने धान्याच्या पुरवठयातील शासकीय यंत्रणेवर होणारे आरोप बंद झाले व धान्यवाटपातील काळ्याबाजारावरील रामबाण इलाज म्हणून ही योजना अंमलात आणल्याचे चित्र लोकांसमोर स्पष्ट झाले.<br>▪ प्रचलित व्यवस्थेतील धान्य वितरणाचा खर्च कमी करुन धान्य लोकांपर्यंत पोहोचविण्याची खात्री देणारी ही योजना पथदर्शी ठरली आहे.<br>▪ पुरवठा साखळीतील गैरप्रकार व त्रुटींना आळा बसला. |